पुण्य नगरी

# महिलांचा छळ थांबायला हवा : डॉ. शेळके

**पुणतांबा :** कामाच्या ठिकाणी शारीरिक व लैंगिक छळाच्या प्रसंगांना शहरी आणि ग्रामीण भागातील महिलांना मोठ्या प्रमाणावर सामोरे जावे लागते. आपली बदनामी होईल, कुटुंबात आपले म्हणणे कोणी ऐकून घेणार नाही, आपल्यालाच दोष देतील, अशी मनस्थिती महिलांची असते. त्या विरोधातली कायद्याची अंमलबजावणी अद्याप प्रभावीपणे केली जात नाही. ग्रामीण भागात महिलांवरील अत्याचाराचे प्रमाण वाढले आहे. हे थांबविण्यासाठी समाजाने पुढाकार घ्यावा, असे आवाहन आशा केंद्राचे कार्यकारी विश्वस्त डॉ. सुरेश शेळके यांनी केले.

महिलांच्या सुरक्षेसाठी असलेल्या पॉश याकायद्याला १० वर्षे पूर्ण झाली. त्या निमित्ताने आयोजित कार्यक्रमात डॉ. शेळके बोलत होते. ते पुढे म्हणाले, आशा केंद्राच्या माध्यमातून ग्रामीण भागात आरोग्य व महिलांच्या प्रश्नांवर काम करताना अनेक प्रसंग महिलांच्या सुरक्षेसंदर्भात समोर येतात. महिलांच्या सुरक्षेसाठी 'कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ (प्रतिबंध, मनाई व निवारण) अधिनियम २०१३' कायदा करण्यात आला. या कायद्याची प्रभावीपणे अंमलबजावणी कशी होईल, यासाठी प्रयत्न होणे आवश्यक आहे. या कायद्याबद्दल आणि एकंदरीतच लिंग समभाव रुजविण्यासाठी मुले, युवक आणि पुरुषांसोबत मोठ्या प्रमाणावर काम करणे ही काळाची गरज आहे. अनेक ठिकाणी अशा समित्याच तयार झाल्या नाहीत, ज्या ठिकाणी आहेत त्या केवळ कागदावरच आहेत. समिती सदस्याचे बोर्ड कोठेतरी संस्था चालाकाच्या केबिनमध्ये लावले आहेत. ग्रामीण भागात काम करत असताना लोकांना शिक्षित करणे, कायद्याचे ज्ञान देणे, लिंगसमभाव रुजविणे, ज्या समित्या आहेत, त्याचे कामकाज नीट होते का हे पाहणे, पीडित महिलेला न्याय मिळेल, कामाच्या ठिकाणी सुरक्षित वातावरण मिळेल, याची जबाबदारी आपल्या सर्वांवर आहे, असे डॉ. शेळके यांनी स्पष्ट केले.

Smart Shrirampur Edition
Dec 11, 2023 Page No. 2
Powered by : eReleGo.com